# सातारा जिल्हा पोलीस दल

## सायबर फ्रॉड मुक्त सातारा जिल्हा अभियान



### डिजीटल अ‍ॅरेस्ट

- स्कॅमर्स पोलीस किंवा सीबीआय अधिकाऱ्यांच्या नावाने खोटे आरोप लावतात
- नेहमी अधिकृत अधिकाऱ्यांकडून तपासणी करा
- सायबर क्राईम हेल्पलाईन 1930/1945 वर तक्रार नोंदवा
- ते बनावट दस्तऐवज दाखवून अटक टाळण्यासाठी पैसे मागतात
- अशा व्यक्तींना पैसे देऊ नका किंवा वैयक्तिक माहिती शेअर करु नका.

### डिजीटल अ‍ॅरेस्ट टाळण्यासाठी काय करावे ?

**कोणत्याही दबावाला बळी पडू नका, ही फसवणूक टाळण्याची गुरुकिल्ली आहे.**

1. कॉल कट करा : अनोळखी नंबरवरुन आलेला व्हिडीओ कॉल किंवा कोणत्याही प्रकारचा कॉल लगेच कट करा. खासकरुन +91 व्यतिरिक्त इतर देशांच्या कोड (उदा. +44, +65) मधून आलेला कॉलला उत्तर देऊ नका.
2. माहिती देऊ नका : OTP, CVV, पिन, पासवर्ड, आधार, पॅन किंवा बँक खाते क्रमांक कधीही शेअर करु नका. असे कोणतेही तपशील बँक किंवा पोलीस मागत नाही
3. पैसे पाठवू नका : अटक किंवा कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी दंड किंवा सुरक्षा ठेवू म्हणून पैसे मागितल्यास ते पाठवू नका.
4. ब्लॉक करा : कॉलरचा नंबर लगेच ब्लॉक करा आणि स्क्रिनशॉट किंवा स्क्रिन रेकॉर्ड पुरावा म्हणून जपून ठेवा.
5. तक्रार नोंदवा : ताबडतोब राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टल (cybercrime.gov.in) वर किंवा सायबर हेल्पलाईन 1930 / 1945 वर संपर्क करा
6. माहितीची पडताळणी करा : तुम्हाला आलेली कोणतीही कायदेशीर धमकी खरी आहे का ते तपासण्यासाठी स्थानिक पोलीस स्टेशनला किंवा सरकारी पोर्टल्सचा वापर करा.

**काय लक्षात ठेवावे**

1. डिजीटल अरेस्ट अस्तित्वात नाही : पोलीस किंवा सरकारी अधिकारी तुम्हाला व्हिडीओ कॉल करुन अटक करत नाहीत ते प्रत्यक्ष येऊन वॉरंट दाखवतात
2. भिती हेच त्यांचे शस्त्र : स्कॅमर्स भिती निर्माण करुन तुमच्याकडून घाईघाईने कृती करुन घेतात. त्यामुळे शांत राहून विचार करणे महत्वाचे आहे.






### बॅंकिंग APK फसवणूक
### BANKING APK FRAUD

- फसवणूक करणारे बनावट फिशिंग लिंक किंवा . APK file पाठवून लोकांना खोटे बॅंकिंग ॲप डाऊनलोड करायला लावतात आणि त्यांची वैयक्तिक व आथर्कमाहिती चोरतात.

### सोशल मिडिया आणि इमेलव्दारे फिशिंग हल्ले



- बनावट इमेल किंवा पोस्ट व्दारे फसवणूक पासवर्ड घेऊन आर्थिक आणि वैयक्तिक माहितीचा वापर करुन आयडेंटी चोरी आणि आर्थिक फसवणूक केली जाते



### क्रेडीट कार्ड फसवणूक

- आपले नांवे असलेले क्रेडीट कार्डबाबत एसएमएस व ओटीपी पाठवून आर्थिक फसवणूक केली जाते अनोळखी बॅंक अलर्ट पासून सावधान रहा

मोबाईल हरवला किंवा चोरी झाला असेल तर CEIR पोर्टलवर तक्रार दाखल करा.




### मोबाईल चोरी
www.ceir.gov.in



## सायबर पोलीस स्टेशन सातारा

| राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल हेल्पलाईन नंबर | राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल वेबसाईट | महाराष्ट्र सायबर रिपोर्टींग पोर्टल हेल्पलाईन नंबर |
|---|---|---|
| 1930 | https://www.cybercrime.gov.in | 1945 |

## सातारा पोलीस आपल्या मदतीसाठी २४ तास तत्पर





**100 नाही डायल करा 112**






### महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली कार्यपध्दती सातारा पोलीस डायल 112 नियंत्रण कक्ष



- ०१ पिडीत नागरिक
- ०२ पिडित नागरिकाचा डायल ११२ ला संपर्क
- ०३ कॉल सेंटर येथे तक्रार नोंद
- ०४ जिल्हा नियंत्रण कक्ष येथे तक्रार प्राप्त
- ०५ तक्रार जवळील जलद प्रतिसाद वाहनास पाठविली
- ०६ जलद प्रतिसाद वाहन घटनेच्या ठिकाणी दाखल
- ०७ तक्रारीचे निवारण पोलीस स्टेशनला नोंद/हस्तांतरण
- ०८ त्रस्त नागरिकाचा अभिप्राय
- ०९ समाधानी नागरिक

## STOP VIOLENCE AGAINST WOMEN

**निर्भया पथक**

**महिलांचे संरक्षण व टवाळखोरांचे समुल उच्चाटण**




**महिला व मुलींची छेडछाड किंवा अत्याचार झाल्यास त्वरीत खालील नंबरवर संपर्क साधावा**

**हेल्पलाईन नंबर 112/1091/1098**

| विभाग | संपर्क नंबर |
|---|---|
| सातारा विभाग निर्भया पथक | ०२१६२ – २३४८८६ |
| कोरेगांव विभाग निर्भया पथक | ०२१६३ – २२२८१८ |
| वाई विभाग निर्भया पथक | ०२१६७ – २२७७३३ |
| फलटण विभाग निर्भया पथक | ०२१६६ – २२२४६८ |
| दहिवडी विभाग निर्भया पथक | ०२१६१ – २३२२२२ |
| कराड विभाग निर्भया पथक | ०२१६४ – २२२३४५ |
| पाटण विभाग निर्भया पथक | ०२३७२ – २८२३३६ |

स्त्रीत्वाला छेडण्याची करु नको हिम्मत प्रत्येक स्त्रीच्या पाठी निर्भयाची ताकद

## अभया उपक्रम




आता निश्चिंतपणे रिक्षाने प्रवास करा काही अडचण निर्माण झाल्यास मदतीसाठी रिक्षातील क्यूआर कोड स्कॅन करुन अभया प्रकल्पाचा वापर करा.

## पिंकस्कुटी



सातारा जिल्हयातील पोलीस ठाणे येथे महिलांचे संबंधित प्राप्त तक्रारीवर तात्काळ मदत पोहचविणेकामी गुलाबी स्कुटी (पिंकस्कुटी) या योजनेची सुरवात करणेत आलेली आहे. त्या मुळे महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे.

**पोलीस काका पोलीस दीदी :** बालकांचे हक्क व सुरक्षितता प्रशिक्षण पोलीस काका पोलीस दीदी या उपक्रमांतर्गत पोलीस ठाणे स्तरावर शाळा कॉलेज मध्ये वेळो वेळी भेटी देवून प्रचलीत कायद्याचे ज्ञान, बालकांचे लैंगीक अत्याचार संरक्षण कायदा व इतर संबंधीत कायदे विषयक मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रम घेणेत येत असतात.

## चाईल्ड हेल्प लाईन 1098



- जर एखादे बालक हरविले असेल किंवा विनापालक मिळून आले असेल तर.
- जर एखादे बालक व्यसनाधिन आढळल्यास तसेच एखाद्या बालकाला वैद्यकीय उपचाराची मदत हवी असेल तर.
- जर एखादे बालक भिक मागत असताना आढळुन आले असेल तर.
- जर धोकादायक क्षेत्रात बाल कामगार आढळून आले तर.
- जर एखादे बालक शिक्षणापासून वंचित रहात असेल तर.
- जर एखाद्या बालकाचे लैंगिक, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण होत असेल तर.
- एक पालक, अनाथ बालकास संस्थेत दाखल करावयाचे असेल किंवा दत्तक घ्यायचे असेल तर.
- जर एखाद्या बालकाच्या अधिकारांचे उल्लंघन होत असेल तर.
- कुमारी माता आढळल्यास तसेच नवजात अर्भक सापडले असेल तर.
- जर एखाद्या बालकाला समुपदेशनाची आवश्यक्ता असेल तर.

### बालविवाह हा कायद्याने गुन्हा आहे

जर 18 वर्षाखालील मुलीचा व 21 वर्षाखालील मुलाचा विवाह होत असेल तर चाईल्ड हेल्पलाईन 1098 या क्रमांकावर संपर्क करा.

**चला तर मग सर्वांनी मिळून बालविवाहास विरोध करुयात, सातारा जिल्हा बालविवाह मुक्त करुयात आणि बालविवाह मुक्त महाराष्ट्र अभियानात सहभागी होऊयात !**